## मुख्य कार्यालय, विरार

विरार (पुर्व),
ता.वसई, जि.पालघर, पिन- ४०१ ३०५.

दुरध्वनी :०२५०-२५२५१०५/०६/२५२९८८८/२५२९८९
फॅक्स: ०२५०-२५२५१०७.
ई- मेल :vasaivirarcorporation@yahoo.com


जावक क्र :व.वि.श.म /वृक्षप्राधि/ ५९२/२०२४

दिनांक : ०७/०८/२०२४

### वसई-विरार शहर महानगरपालिका
### वृक्षप्राधिकरण विभाग
### जाहिर सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ कलम ८ (३) क मधील तरतुदीनुसार, सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, खालील नमूद वृक्ष कापणे बाबतचा अर्ज वृक्षप्राधिकरण विभागात प्राप्त झालेला असून सदर प्रकरणी सूचना प्रसिदधी पासून ०७ दिवसांकरीता हरकती व सूचना मागविण्यात येत आहेत. संबंधित अर्ज व इतर तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | अर्जदाराचे नाव व पत्ता | प्राप्त अर्ज व दिनांक | कापणेत येणाऱ्या झाडांचा प्रकार व नग | मा.वृक्षअधिकारी यांचेकडे सादर करणेत आलेला मसुदा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री.मोहन अनंत राऊत व इतर, रा- औदुंबर बंगला राऊतवाडी, विरार (प.) | १२/०६/२०२४ | जांभुळ - ०१ | वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये प्रभाग समिती "ए" कार्यक्षेत्रामधील गाव मौजे विरार, सर्वे नं.२९८/अ या नमुद अर्जदार यांच्या मालकी जागेत जांभुळ प्रजातीचे ०१ खूप जुने झाड असून आजू-बाजूच्या घरावर पसरलेले आहे. तसेच सदर झाडांच्या नजीकच विरार स्थानकाकडे जाणारा मुख्य रस्ता असल्याने येणाऱ्या जाणाऱ्या नागरीकांची व वाहनांची वर्दळ असल्याने झाड वादळी वाऱ्यात पडल्यास जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता असल्याने सदरचे धोकादायक झाड कापणेस परवानगी मागितलेली आहे. |
| २ | श्री.वसंत पांडुरंग कारभारी, सौ.छाया जनार्दन कारभारी व श्री.अमित जनार्दन कारभारी, रा- स्वप्नसाकार, नायगाव, कोळीवाडा, आईस फॅक्टरी समोर, नायगाव (प.) | १३/०५/२०२४ | नारळ - ०३ | वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रामधील नमुद अर्जदार यांच्या मालकी जागेत ०३ नग नारळाची रस्त्यावर तसेच अर्जदार यांच्या घरावर आलेली असल्याने जोराच्या वादळी वाऱ्याने नारळ व झावळया पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता असल्याने सदरचे धोकादायक झाड कापणेस परवानगी मागितलेली आहे. |
| ३ | विकासक, मे.श्रीजी ॲण्ड असोसिएटस तर्फे भागिदार श्री.पंकज जे.दोशी, गाव मौजे | १३/०६/२०२४ | जंगली - ०१ (सुकलेले)<br>नारळ - ०२<br><br>**एकूण ०३ झाडे** | वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये प्रभाग समिती "एच" कार्यक्षेत्रामधील गाव मौजे दिवाणमान, येथिल सर्वे नं.१४६ हिस्सा नं.१५, १६, १७, १८ या भुखंडावर वड - ०१, बदाम -०१, जंगली -०१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | दिवाणमान. | | | (सुकलेले), नारळ -०२, उंबर -०१ अशी एकूण ०६ झाडे असून त्यापैकी **जंगली -०१ (सुकलेले), नारळ -०२ अशी एकूण ०३ झाडे** विकासकामात बाधीत होत असल्याने कापणेस परवानगी मिळणेबाबत |

वसई-विरार शहर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण उद्यान विभाग

(प्रियंका राजपुत)
उपआयुक्त तथा वृक्षअधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका